महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : managerbcrrc@gmail.com
Website : www.mahdiscom.in

# सुधारपत्र क्र. ६९ दिनांक १६.०८.२०१६

(म.रा.वि.वि.कं.मर्या., वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५)

**विषय :** ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर नवनिर्मित ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हास्तरीय गट 'क' व 'ड' मधील पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी आरक्षण निश्चित करणे व बिंदुनामावली विहीत करण्याबाबत.

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. २४७ दि. ०१/१२/१९९७.
२) शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२A/१५/१६-ब दि.१९/०१/२०१६.

-----------------

तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे संदर्भ क्र. १ वरील दि. ०१/१२/१९९७ च्या प्रशासकीय परिपत्रकान्वये सरळसेवा भरतीकरिता अनुसूचित जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने जास्त असलेल्या ठाणे, नाशिक, धुळे, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्हयांसाठी वर्ग-३ व वर्ग-४ साठी सेवेत अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण ठेवण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत व त्यानुसार बिंदुनामावली विहीत करण्यात आलेली आहे.

२) आता, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२ A/१५/१६-ब दि. १९ जानेवारी २०१६ नुसार महसूल व वन विभागाच्या शासन अधिसूचना क्र. प्राफेब ११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म.१० दि. ३१ जुलै २०१४ अन्वये दि. १ ऑगस्ट, २०१४ पासून ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा आणि विक्रमगड या ८ तालुक्यांचा समावेश असलेला नवनिर्मित आदिवासी बहुल पालघर जिल्हयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर सध्याच्या विभाजित ठाणे जिल्हयात ठाणे, भिवंडी, शहापूर, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड अशा ७ तालुक्यांचा समावेश आहे.

३) या अनुषंगाने मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महावितरण यांनी संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), संचालक (वित्त),यांच्याशी विचारविनिमय करून उपरोक्त बाबीस मंजुरी प्रदान केली आहे.

४) **शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२ A/१५/१६-ब दि. १९ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.**

अ) ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर मूळ ठाणे जिल्हयातून आदिवासी बहुल तालुके वगळल्यामुळे आता ठाणे जिल्हयामधील आदिवासी लोकसंख्या ही ५.२६ टक्के असल्यामुळे दि. १/८/२०१४ पासून अनुसूचित जमातीकरिता आरक्षणाची टक्केवारी २२ ऐवजी ७ टक्के करण्याबाबत तसेच इतर प्रवर्गाच्या आरक्षणाची टक्केवारी महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ मधील कलम ४(२) नुसार लागू करण्यात येत आहे.

ब) नवनिर्मित पालघर जिल्हयामध्ये आदिवासी लोकसंख्या ३७.३९ टक्के एवढी असल्यामुळे दि. ०१/०८/२०१४ पासून जिल्हास्तरीय गट-'क' व गट-'ड' मधील सरळसेवा भरतीकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के करण्यात येत असून, अन्य प्रवर्गाची टक्केवारी खालील प्रमाणे विहीत करण्यात येत आहे :-

| जिल्हा | अनु.जाती | अनु.जमाती | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १३% | ७% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | ४८% |
| पालघर | ८% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | ९% | ४८% |

५). सध्याच्या ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्हयात जिल्हास्तरीय गट-क व गट-ड च्या सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या भरतीच्यावेळी शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२ A/१५/१६-ब दि. १९ जानेवारी २०१६ सोबतचे **प्रपत्र-'अ'** मध्ये ठाणे जिल्हयाऐवजी पालघर ग्राहय धरण्यात यावे. तसेच ठाणे जिल्हयाकरिता प्रपत्र-१ (Model Roster for Direct Recruitment) ची बिंदूनामावलीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. त्या अनुषंगाने म.रा.वि.वि.कं.मर्या. चे वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ मधील परिशिष्ट 'अ' ची अनुसूची-३ [Classification & Recruitment Regulation-2005 Appendix 'A', Annexure-III] मध्ये अनुसूचित जमातीकरिता असलेल्या आरक्षणामध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **जिल्हयाचे नांव** | **सरळसेवेकरिता अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची सुधारी टक्केवारी** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ठाणे | ७% |
| २ | नाशिक | २२% |
| ३ | धुळे | २२% |
| ४ | रायगड | ९% |
| ५ | यवतमाळ | १४% |
| ६ | चंद्रपूर | १५% |
| ७ | गडचिरोली | १५% |
| ८ | पालघर | २२% |

६) या अनुषंगाने सर्व संबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांना सूचीत करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामधील आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे. अवलोकनार्थ शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

७) सदरचे सुधारपत्र कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आलेआहे.

सोबत : वरील प्रमाणे.

**(संदेश हाके)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

प/१

ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर नवनिर्मित ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हास्तरीय गट-'क' व गट-'ड' मधील पदे सरळसेवेने भरती करण्यासाठी आरक्षण निश्चित करणे व बिंदुनामावली विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०१५/प्र.क्र.१०२A/१५/१६-ब
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १९ जानेवारी, २०१६.

वाचा:-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दिनांक २९ मार्च, १९९७.
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक बीसीसी १०९३/२१६७/प्र.क्र.१४१/९३/१६-ब, दिनांक १ सप्टेंबर, १९९७.
३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक: बीसीसी -२०१४/ प्र.क्र.२१३A /१४/१६-ब, दिनांक ५ मार्च, २०१५ व समक्रमांकाचे शासन शुध्दीपत्रक, दिनांक २६ जून, २०१५.
५. शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक-प्राफेब ११०८/प्र.क्र.१६७/ठाणे/म-१०, दिनांक ३१ जुलै, २०१४.
६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण सुधारणा अधिनियम, २०१५.

प्रस्तावना :-

महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ५ येथे नमूद केलेल्या दिनांक ३१ जुलै, २०१४ च्या अधिसूचने अन्वये दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासून ठाणे जिल्हयाचे विभाजन होऊन पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा आणि विक्रमगड या ८ तालुक्यांचा समावेश असलेला नवनिर्मित आदिवासी बहुल पालघर जिल्हयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर सध्याच्या विभाजित ठाणे जिल्हयात ठाणे, भिवंडी, शहापूर, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, मुरबाड अशा ७ तालुक्यांचा समावेश आहे.

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या आरक्षण अधिनियम, २००१ मध्ये संदर्भाधीन क्रमांक ६ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती ( विमुक्त जाती ), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण सुधारणा अधिनियम, २०१५ (सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३)

अन्वये ठाणे जिल्हयासाठी प्रचलित आरक्षणामध्ये दुरूस्ती व नवनिर्मित पालघर जिल्हयासाठी आरक्षण निश्चिती करण्यात आली आहे. सदर दुरूस्तीनुसार खालील प्रमाणे आरक्षण निश्चित करण्याबाबत तसेच नवनिर्मित पालघर व ठाणे जिल्हयांसाठी जिल्हास्तरीय गट-'क' व गट-'ड' मधील सरळसेवा भरतीकरिता बिंदुनामावली विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

या शासन निर्णयाअन्वये शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

अ) ठाणे जिल्हयाच्या विभाजनानंतर मूळ ठाणे जिल्हयातून आदिवासी बहुल तालुके वगळल्यामुळे आता ठाणे जिल्हयामधील आदिवासी लोकसंख्या ही ५.२६ टक्के असल्यामुळे दि.१.८.२०१४ पासून अनुसूचित जमातीकरिता आरक्षणाची टक्केवारी २२ ऐवजी ७ टक्के करण्याबाबत तसेच इतर प्रवर्गांच्या आरक्षणाची टक्केवारी महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ मधील कलम ४ (२) नुसार लागू करण्यात येत आहे.

ब) नवनिर्मित पालघर जिल्हयामध्ये आदिवासी लोकसंख्या ३७.३९ टक्के एवढी असल्यामुळे दिनांक १.८.२०१४ पासून जिल्हास्तरीय गट-'क' व गट-'ड' मधील सरळसेवा भरतीकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आरक्षणाची टक्केवारी २२ टक्के करण्यात येत असून, अन्य प्रवर्गाची टक्केवारी खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे. :-

| जिल्हा | अनु. जाती | अनु.जमाती | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठाणे | १३% | ७ % | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | १९% | ४८% |
| पालघर | ८% | २२% | ३% | २.५% | ३.५% | २% | २% | ९% | ४८% |

क) या शासन निर्णयानुसार सध्याच्या विभाजित ठाणे जिल्हयाकरिता संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या दिनांक २९ मार्च, १९९७ नुसार प्रचलित असणारी बिंदुनामावली **प्रपत्र- अ** मध्ये दर्शविल्यानुसार लागू राहील.

ड) नवनिर्मित पालघर जिल्हयासाठी, दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पूर्वी अस्तित्वात असलेल्या ठाणे जिल्हयासाठी शासन निर्णय, दिनांक १ सप्टेंबर, १९९७ नुसार प्रचलित असणारी बिंदुनामावली **प्रपत्र-ब** मध्ये दर्शविल्यानुसार लागू राहील.

इ) मा.राज्यपाल यांच्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली १३ संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर १३ संवर्गातील पदांना हा शासन निर्णय लागू होणार नाही.

२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना निदर्शनास आणावा.

३. सध्याच्या ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्हयांत जिल्हास्तरीय गट-'क' व गट-'ड' च्या सरळ सेवेव्दारे करण्यात येणाऱ्या भरतीच्या वेळी वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१७०५२७४२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Krishna Bhosale

Digitally signed by Sanjay Krishna Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sanjay Krishna Bhosale
Date: 2016.01.20 13:09:21 +05'30'

( सं. कृ. भोसले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१.मा.सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२.मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३.मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.
४.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई-३२.
५.सर्व मा. विधानसभा सदस्य/मा.विधानपरिषद सदस्य/मा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६.मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३५.
७.मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८.सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
९.मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा), मुंबई.
१२. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद), मुंबई.
१३.सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), महाराष्ट्र राज्य.
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
१८. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१९. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद.
२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२१.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२.सचिव,राज्य निवडणूक आयोग,मंत्रालय, मुंबई-३२.
२३.सचिव,राज्य माहिती आयोग, मंत्रालय, मुंबई-३२.
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.

२५.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२७.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२८.संचालक, समाजकल्याण, पुणे.
२९.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
३०.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
३१.संचालक, सेवायोजन, मुंबई.
३२.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
३३.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३६.सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३७.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई. (५ प्रती)
३८.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य.
३९.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

ठाणे जिल्हयासाठी बिंदुनामावली
प्रपत्र-अ

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | **इतर मागास वर्ग** |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | खुला | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | खुला | ७२ | खुला |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | **इतर मागास वर्ग** | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | खुला | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | खुला | ७६ | खुला |
| ९ | **इतर मागास वर्ग** | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | **इतर मागास वर्ग** |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | खुला | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | **अनुसूचित जाती** |
| १४ | खुला | ४८ | खुला | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | **इतर मागास वर्ग** | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | खुला | ५० | खुला | ८४ | खुला |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | **अनुसूचित जाती** | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | खुला | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | खुला | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | **इतर मागास वर्ग** |
| २२ | खुला | ५६ | **खुला** | ९० | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | खुला | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | **इतर मागास वर्ग** | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | खुला | ९४ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | **इतर मागास वर्ग** |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | खुला |
| २९ | **इतर मागास वर्ग** | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | खुला | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | खुला | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | **अनुसूचित जाती** | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

वर्गवारीनुसार आरक्षित पदे

| अनुक्रमांक | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | बिंदु क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३% | १, १२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३, ८१, ९१, ९७ | |
| २ | अनुसूचित जमाती | ७% | २, २३, ३३, ५३, ६३, ७१, ९३ | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% | ३, ४१, ८३, | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५% | ४, ४७ | ९९(ब/क) |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५% | ७, ३१, ५७, | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% | ११, ७७ | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २% | १५, ८७ | |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | १९% | ५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५ | |
| ९ | खुला | ४८% | ६, ८, १०, १३, १४, १६, १८, २०, २२, २४, २६, २८, ३०, ३२, ३४, ३६, ३८, ४०, ४२, ४४, ४६, ४८, ५०, ५२, ५४, ५६, ५८, ६०, ६२, ६४, ६६, ६८, ७०, ७२, ७४, ७६, ७८, ८०, ८२, ८४, ८६, ८८, ९०, ९२, ९४, ९६, ९८, १०० | |

## नवनिर्मित पालघर जिल्हयासाठी बिंदुनामावली

### प्रपत्र-ब

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | **अनुसूचित जमाती** |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | खुला | ७० | खुला |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जमाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | खुला | ७२ | खुला |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | **अनुसूचित जमाती** | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | खुला | ४० | खुला | ७४ | खुला |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | खुला | ४२ | खुला | ७६ | खुला |
| ९ | **अनुसूचित जमाती** | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | खुला | ४४ | खुला | ७८ | खुला |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | **अनुसूचित जमाती** |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | खुला | ८० | खुला |
| १३ | खुला | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | **अनुसूचित जमाती** |
| १४ | खुला | ४८ | खुला | ८२ | खुला |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | **अनुसूचित जमाती** | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | खुला | ५० | खुला | ८४ | खुला |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | **अनुसूचित जमाती** | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | खुला | ५२ | खुला | ८६ | खुला |
| १९ | **अनुसूचित जमाती** | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | खुला | ५४ | खुला | ८८ | खुला |
| २१ | अनुसूचित जमाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | **अनुसूचित जमाती** |
| २२ | खुला | ५६ | **खुला** | ९० | खुला |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | खुला | ५८ | खुला | ९२ | खुला |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | **अनुसूचित जमाती** | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | खुला | ६० | खुला | ९४ | खुला |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | **अनुसूचित जमाती** |
| २८ | खुला | ६२ | खुला | ९६ | खुला |
| २९ | **अनुसूचित जमाती** | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | खुला | ६४ | खुला | ९८ | खुला |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (ब)/(क) |
| ३२ | खुला | ६६ | खुला | १०० | खुला |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | **अनुसूचित जमाती** | | |
| ३४ | खुला | ६८ | खुला | | |

प्रवर्गनिहाय आरक्षणाची टक्केवारी :-

| अनुक्रमांक | प्रवर्ग | आरक्षणाची टक्केवारी | बिंदु क्रमांक | |
|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ८% | १, १२, २७, ४३, ६१, ७३, ९१, ९७ | |
| २ | अनुसूचित जमाती | २२% | २, ९, १९, २१, २३, २९, ३३, ३७, ३९, ४९, ५१, ५३, ५९, ६३, ६७, ६९, ७१, ७९, ८१, ८९, ९३, ९५ | |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३% | ३, ४१, ८३, | |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५% | ४, ४७ | ९९(ब/क) |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५% | ७, ३१, ५७, | |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २% | ११, ७७ | |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २% | १५, ८७ | |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ९% | ५, १७, २५, ३५, ४५, ५५, ६५, ७५, ८५ | |
| ९ | खुला | ४८% | ६, ८,१०, १३, १४, १६, १८, २०, २२, २४, २६, २८, ३०, ३२, ३४, ३६, ३८, ४०, ४२, ४४, ४६, ४८,५०, ५२, ५४, ५६, ५८, ६०, ६२, ६४, ६६, ६८, ७०, ७२, ७४, ७६, ७८, ८०, ८२, ८४, ८६, ८८, ९०, ९२, ९४, ९६, ९८, १०० | |